# प्रकरण पहिले

## मराठी कथावाङ्‌मय : उदय - वाटचाल व विकास

# प्रकरण पहिले

## मराठी कथावाङ्मय : उदय - वाटचाल व विकास

### अ· एकूण कथावाङ्मयाच्या अनुषंगाने :-

#### 1· उदय ते इ·स·1800 :-

मराठी वाङ्मयाला स्वतःचा असा फार मोठा इतिहास लाभला आहे· तसेच त्याला वैभवशाली परंपराही लाभली आहे, याची प्रतिती मराठी कथावाङ्मयाच्या उदयापासून आजतागायतपर्यंतच्या त्याच्या वाटचालीचा मागोवा घेतला तर सहज येऊ शकेल·

अगदी पाठीमागे पूराणकाळात जाऊनही मराठी कथावाङ्मयाची बीजे आपणास पहावयास मिळतात· आणि अतिप्राचीन काळातंच मराठी कथावाङ्मयाच्या जन्मखूणा सापडतात· जागतिक कथावाङ्मयाच्या दृष्टीने गोष्टी, कहाण्या, कथा, लघुकथा असे सर्वसाधारणपणे कथावाङ्मयाचे वर्गीकरण केले जाते·

भारतीय कथावाङ्मयाच्या जन्मखूणा अगदी वेदकालापर्यंत मागे जाऊन शोधता येतात· श्री·श्रोत्रिय यांच्या "वेदांतील गोष्टी" या भारतीय कथावाङ्मयाचे मूळ ठरतात· परंतु फक्त मराठी भाषेतील कथावाङ्मयाच्या जन्मखूणा शोधायच्या म्हटल्या तर, तेराव्या शतकाच्या पूर्वार्धातील विष्णुशर्मा यांचे "पंचतंत्र" हे मराठी भाषेतील पहिले कथावाङ्मयाचे पुस्तक ग्रहीत धरावे लागते· एकूणच आपल्या कथावाङ्मयाबाबत "पंचतंत्र", त्यानंतरचे "हितोपदेश," "बृहत्कथा" "बृहत्कथा मंजिरी " "कथा सरित्सागर," "वेताळ पंचवीशी " "शुकबहात्तरी " "सिंहासन बत्तीसी" इत्यादी कथावाङ्मय ग्रंथ सापडतात· तसेच लोककथा, कहाण्या, भाकडकथा,

जावईबुवांच्या गोष्टी यासारखे लोकवाङ्मय हे कथावाङ्मयाच्या क्षेत्रातील सुरुवातीचे पायाभूत कथावाङ्मय ठरते, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही· याच काळात पाश्चिमात्य देशात इटालियन कथाकार बोकॅशिओचे "डेकॅमेरॉन" व " चॉसरचे "कॅंटरबरी टेल्स " यासारखे कथावाङ्मय निर्माण झाले· याचे स्वरूपही आपल्याकडील कथावाङ्मयासारखेच होते·

याही पाठीमागे जाऊन कथावाङ्मयाच्या खुणा सापडणार नाहीत असे नाही· अगदी प्राचीन काळातील इतरही काही परिकथा, नीतीकथा, दैवतकथा, लोककथा, बौध्दांच्या जातककथा याही तसे कथावाङ्मयाचा पायाभूत सारच होय· महाकाव्यावर आधारलेल्या पूराणकथा सुध्दा यादृष्टीने महत्त्वाच्या ठरतात· तसा श्राव्यरूप कथावाङ्मयाचा उदयेतिहास याही खूप पाठीमागे जाईल· परंतु फक्त लिखित स्वरूपातील मराठी कथावाङ्मयाच्या उदयाच्या दृष्टीने विचार करणे येथे इष्ट ठरते· या काळातील कथावाङ्मयाचे उद्दिष्ट हे मूलतः नीतितत्त्वबोध देण्याचे होते· या काळात लोकवाङ्मयाची जी वैशिष्ट्ये होती, तीच वैशिष्ट्ये या कथा मधूनही उतरलेली दिसतात· ती म्हणजे - नीतितत्त्वाची बैठक, आविष्कारातील सरळपणा आणि भाषेच्या साधेपणातील गोडवा, ही ती वैशिष्ट्ये· "6व्या शतकात भारतीय प्राचीन कथांनी चीनमध्ये प्रवेश केला· असाही उल्लेख आढळतो· या काळातील कथावाङ्मयाकडे पाहण्याची भारतीय दृष्टी होती ही भाविकतेची व नीतिबोध देण्याची होती, हे उघड आहे·"1

या काळातील कथांचे स्थान विकसनशील अगर महत्त्वाचे होते असे मूळीच नाही· त्या काळी लोकांची कथावाचनाची आणि श्रवणाची भूक भागवण्याचे कार्य "पंडिती काव्याने" फार मोठया प्रमाणावर केले· तत्कालीन लोकाभिरूची लक्षात घेऊनच संत एकनाथांनी "आख्यानक काव्या"चा श्रीगणेशा केला· त्यानंतर मुक्तेश्वर, सामराज, रघुनाथ पंडित, वामन पंडित, नागेश, विठ्ठल बिडकर, निरंजन माधव, श्रीधर, मोरोपंत इत्यादी पंडित कवींनी "महाभारत" व "रामायण" यावर आधारीत आख्यानकाव्याची प्रचंड रचना केली· या काळात पद्य रचनाबंधाला विशेष महत्त्व

होते· अर्थातच जे काही सांगायचे ते पद्यातूनच सांगावे असा जवळजवळ सर्रास प्रघात, दंडक तथा संकेत असल्याने गद्यवाङ्मयप्रकार म्हणावा तितका विकसित झाला नाही· यामुळेच या काळात गद्याला वैभवशाली वळण लाभलेच नाही, असे म्हणणेच अधिक संयुक्तीक ठरते·

2· इ·स·1800 ते इ·स·1885 :-

हा कालखंड मुख्यतः इंग्रजी राजवटीचा कालखंड· या काळातही कथा-वाङ्मयाची निर्मिती झाली· देशी भाषेतील ग्रंथ निर्मितीला इंग्रज सरकारने चालना दिली· त्यातूनच संस्कृत व इंग्रजीतील बोधपर कथांची मराठीत भाषांतरे सुरू झाली· "हतीमताई," "गुलबकावली" यासारख्या अद्भूतरम्य व साहसप्रधान कथा जन्मास आल्या· 1850 साली प्रसिध्द झालेल्या वाचनपाठमालेत कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या "दोन रुपयांची योग्यता" व यांसारख्याच दोन ती कथांचा समावेश आहे· या कथा म्हणजे भाषांतरित गोष्टीच आहेत· या काळामध्ये कथावाङ्मयाच्या क्षेत्रात भाषांतरीत कथांना उत आला होता· या काळच्या कथाक्षेत्रात कृष्णशास्त्री चिपळूणकर व स·का·छत्रे यांचे प्रयत्न लक्षवेधक आहेत· चिपळूणकरांनी "अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारीत गोष्टी" लिहिल्या तर सदाशिव काशिनाथ उर्फ बापू छत्रे यांनी "बाळमित्र" हा भाषांतरीत संग्रह लिहला· चिपळूणकरानी अरबी भाषेतील गोष्टींचे भाषांतर अगदी सफाईदारपणे आणि रसाळपणे केलेले दिसून येते· मात्र छत्र्यांचे बाळमित्र हे काहीसे संस्कृतप्रच्चुर असले तरी त्यांची भाषा अत्यंत सुबोध आणि सुंदर मराठी वळणाची आहे· छत्र्यांनी इंग्रज अधिका-यांच्या सुचनेवरुन 'Children's Friend' चे रूपांतर मराठीत केले· ही आवृत्ती प्रसिध्द झाल्यावर लोकांनी तिचा उदोउदो केला· या कालखंडातील कथा मुख्यतः भाषांतरीत होत्या म्हणून या कालखंडाला कथावाङ्मयाचे "भाषांतर युग" म्हणावे लागेल·

भाषांतर युगातील या कथांना आत्मप्रत्ययाचे भान नव्हते· त्यांचे स्वरुप हे मुख्यतः शालोपयोगी व बाळबोध वळणाचे होते· याचसंदर्भात म·ना·अवदंत म्हणतात, - "करमणूकपूर्व कालखंडातील ﴾भाषांतर कालखंड﴿ कथा ही अशी परप्रकाशित,

सामान्य व दुबळी होती· तिला स्वतःची शैली नव्हती· स्वतःचा आकार नव्हता व स्वतःचे विश्व नव्हते·"[2] अर्थातच तिच्यामध्ये आत्मपरतेची उणीव होती· परंतु पुढे हरिभाऊंनी या कथेचे स्वरूपच पालटून टाकले·

3· 1885 ते 1925 :-

कथावाङ्मयाच्या दृष्टीने हा कालखंड अधिक लक्षात घेण्यासारखा आहे· या कालखंडापर्यंत कथावाङ्मय अद्‌भूतरम्य वातावरणात रमलेले दिसते· तत्कालीन समाजाची अभिरूची याच स्वरूपाची होती· त्यामुळे कथावाङ्मयाचे कलात्मक अंग व त्याचे वाङ्मयीन दृष्टया मुल्यमापन करण्याचा हा काळ नव्हता· त्या कथेला लोकवाङ्मयाचे स्वरूप होते· म्हणून तर चमत्कारित व अवास्तव घटना प्रसंगांचे वर्णन तत्कालीन कथावाङ्मयातून प्रकर्षाने जाणवते·

1885 पासून मात्र कथेला अद्‌भूत-काल्पनिक विश्वातून बाहेर काढण्याचे प्रयत्न ख-या अर्थाने हरिभाऊ आपटे यांनीच केले· (प्रत्यक्ष जीवनातील घटना व प्रसंग विस्तृतपणे व तपशीलवार मांडून हरिभाऊनी कथालेखन केले·) या कथांतून पाल्हाळ, तपशीलवार वर्णने व पुनरूक्ती हे दोष आढळले तरी ही कथा वास्तवाच्या अनुभूतीचा आविष्कारच होती· वास्तवता व काल्पनिकता याच्यातील फरक वाचकाच्या लक्षात येऊन कथावाङ्मयाचे आकर्षण वाढू लागले· वास्तव जीवनाचा पुनःप्रत्यय घेण्याचा आस्वाद हरिभाऊंच्या कथेने दिला·

1885 ते 1925 या कालखंडात "करमणूक" व "मनोरंजन" या दोन मासिकांचा उदय झाला· या मासिकातून हरिभाऊंच्या कथा प्रकाशित होऊ लागल्या· प्रत्यक्ष जीवनातील सुखदुःखे व हरिभाऊंच्या कथेतील सुखदुःखे यात साम्य आढळू लागले· लौकीक जीवनातील सुखदुःखाचे प्रसंग हरिभाऊनी साध्या-सरळ भाषेत अचूकपणे टिपले· आणि त्यांच्या कथांनी वाचकांचे लक्ष वेधून घेतले· हरिभाऊनी "स्फूट गोष्टी" लिहल्या आहेत· उदा· "डिस्पेप्सिया," "पहिले भांडण," "दोन चित्रे" इत्यादि· त्यांनी मोपॉसाँच्या "नेकलेस" वरून "पूरी हौस फिटली" ही कथा लिहली· तसेच "थोडया चूकीचे घोर परिणाम" किंवा "उपकाराची फेड अपकाराने" यासारख्या छोटेखानी

कादंबरीवजा कथा त्यांनी लिहल्या· कथा म्हणजे जी कादंबरीइतकी प्रदीर्घ नाही ती - अशीच ढोबळ जाणीव या काळाची दिसते· हरिभाऊ कालीन कथेत आटोपशीरपणा, एकसूत्रीपणा, सूचकता इ· कलात्मक अंगे उपेक्षीत राहिली· कथेमध्ये रंजकतेची उणीव दिसून आली तरीही कथेला वास्तवाचे अधिष्ठान प्राप्त करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य हरिभाऊंनीच केले हे विसरून चालत नाही· हरिभाऊंच्या कथेनेच पुढील लेखकांना वास्तवतेचे व कल्पकतेचे सुरेख समन्वय साधलेले रंजक जीवनचित्र रेखाटण्याची प्रेरणा दिली· त्यांच्या कथेने कथावाङ्मयाच्या विकासगर्भ वाटचालीला नवे वळण दिले, नवी दिशा दाखवली·

हरिभाऊंच्या याच वास्तवपूर्ण पार्श्वभूमीवर वि·सी·गुर्जरानी कथालेखन केले· (मध्यमवर्गीयांच्या जीवनातील साधे घटना-प्रसंग, त्यानी आपल्या कथेत आणले·) त्यानी अनेक बंगाली कथांची रूपांतरे केली आहेत· त्यांचे कथालेखन विपुल आहे· ते हरिभाऊंपेक्षाही अधिक सफाईदार आहे· तपशीलवार वर्णने व पाल्हाळ याला त्यांनी छेद दिला· गुर्जरांनी मराठी कथेला रंजकता बहार करून तिला लोकप्रियता मिळवून दिली· "पुरूषाची जात", "शेवटचे हास्य" या त्यांच्या कथा उत्कृष्ट होत· गुर्जरांचे समकालीन कृ·के·गोखले· गोखल्यांनी काही विनोदी कथा लिहल्या आहेत· "खूप केलीत सूनबाई" ही त्यांची हास्यकारक कथा उल्लेखनीय आहे· तद्नंतर ना·ह·आपटे, सरस्वती कुमार, श्री·कृ·कोल्हटकर, न·चि·केळकर, शि·म·परांजपे आदी लेखकांचे कथालेखन अभ्यसनीय ठरते· कोल्हटकर हे एक नामवंत टीकाकर व श्रेष्ठ विनोदकार होत· तरी त्यांनी कथालेखन केलेलेही आढळते· "गाणारे यंत्र," "संपादिका," "गरीब बिचारे पाडस" - या त्यांच्या कथा, (त्यांचे कथालेखन म्हणजे वास्तवाच्या विनोदी अंगावर कल्पकतेचा चढवलेला सुंदर साज होय·) त्यांच्या कथांमधून अतिशयोक्ती, अतिरंजितता, व असंभाव्यता यांचा अतिरेक दिसतो· परंतु त्यामध्ये वास्तव दडलेले असते, हे नाकारता येत नाही· न·चि·केळकर यांचे कथालेखन वैचारिक असून, त्या वैचारिकतेला वास्तवाचे भान असल्याचे दिसते· उदा· "माझी आगगाडी कशी चुकली" ही त्यांची कथा वास्तवपूर्ण आहे· तसेच मामा वरेरकर, ना·ह·आपटे यांनीही अल्पसे कथालेखन केले· वरेरकरांनी "कलिकेचे अश्रू", "माडाचा

पोर" यासारख्या सुंदर वास्तव कथा लिहल्या· तर ना·ह·आपटे यांनी बोधवादी कथा लिहल्या·

एकूणच या काळातील कथा रंजक होऊ लागली· वरवरची गुंतागुंत आणि सुखान्त शेवट असे तिचे स्वरूप होते· परंतु दिवाकर कृष्णांच्या कथेचे स्वरूप मात्र याहून वेगळे होते· त्यांच्या कथांचा शेवट शोकान्त आहे· त्यांनी घटनेपेक्षा मनोविश्लेषणावर अधिक भर दिलेला आहे· त्यांच्या कथेने अधिक लक्ष वेधून घेतले· त्यांच्या पूर्वीच्या लेखकांचा सुखान्त कथा लिहण्याकडे कल होता· मात्र सुखापेक्षाही दुःख कसे चटका लाऊन जाते, हे दिवाकर कृष्णांच्या कथेने दाखवून दिले· शोकान्त शेवट हे त्यांच्या कथांचे वैशिष्ट, संकष्टी चतुर्थी", "मृणालीनीचे लावण्य", "अंगणातला पोपट" या त्यांच्या उत्कृष्ट कारूण्यमय कथा होत· त्यांच्या कथांनी कलात्मक उंची गाठल्याचे दिसते· वास्तवतेवर उभे राहिलेले कथावाङ्मय दिवाकर कृष्णानी अधिक सूक्ष्म व अंतःस्पर्शी केले· दरम्यानच्या काळात फ्राइडचे मानसशास्त्र परिचित झाले होते· व्यक्तिच्या बाह्यजीवनाचे दर्शन घडवण्याऐवजी दिवाकर कृष्णांच्या कथांनी व्यक्तिच्या अंत-र्मनाचे भावनात्मक स्पंदन टिपले· मराठी कथावाङ्मयात मनो-विश्लेषणात्मक कथेचा त्यांनी पाया घातला· मानवी मनाचे भावदर्शन सूक्ष्म अतिसूक्ष्म रूपात प्रभावीपणे घडवण्यात त्यांची कथा यशस्वी होऊ लागली·

20व्या शतकात प्रसिध्द इंग्रज कादंबरीकार व लघुकथा लेखक "सॉमरसेट मॉम" याने लघुकथेवर लेख लिहायला सुरूवात केली· कथालेखनाचे आदर्श उदाहरण म्हणून मॉमने मोपासॉच्या "नेकलेस" या कथेचा उल्लेख केला आहे· मोपासॉ हाही एक या काळातील जगप्रसिध्द कथाकार· त्याने "वारस" नावाची आपली सुप्रसिध्द कथा दोन वेळा लिहिली· एक दीर्घकथा आणि एक लघुकथा· कथेतून लघुकथा या स्वतंत्र वाङ्मय प्रकाराचा जन्म झाला, असेच येथे म्हणावेसे वाटते· अमेरिकन कथाकार "एडगर ॲलन पो" याने लघुकथा या स्वतंत्र वाङ्मयप्रकाराची सुसूत्रपणे चर्चा केली आहे·

याच काळात आपल्याकडे मात्र लघुकथा हा स्वतंत्र वाङ्‌मयप्रकार आहे, अगर त्याला स्वतःची अशी कलात्मक अंगे आहेत याची जाणीव या काळाला विशेषतः मराठी भाषिकांना झालेली नव्हती. हरिभाऊ आपटेंच्या "स्फूट गोष्टी"मधील बहुतेक कथा या जरी गोष्टीरूप असल्यातरी त्यामध्ये लघुकथेची बीजे असल्याचे दिसून येते. अर्थात हरिभाऊंनी लघुकथेचा जाणीवपूर्वक आविष्कार केला होता असे मात्र म्हणता येत नाही. तरीही अपघाताने का होईना त्यांची कथा लघुकथेला जवळ जाणारी वाटते. (आटोपशीरपणा, पात्रप्रसंगांची मर्यादा, औचित्य, उत्कंठा, रंजकता या बाबींचा त्यांच्या कथेत अभाव दिसला तरी कथावाङ्‌मयाच्या वाटचालीत त्यांनी मोलाची भर घातली आहे.) या काळात एकूण मराठी गोष्टीलाच "कथा"पण प्राप्त झाले नव्हते, असे दिसते.

तरीही दिवाकर कृष्णांनी मात्र कथेकडे एक कलाप्रकार म्हणून पाहिले. आपल्या मनोविश्लेषणात्मक कथांतून त्यांनी तशी जाणीव करून दिली. त्यांची कथा ही जुन्या व नव्या कथेतील महत्त्वाचा दुवा ठरते. गाडगीळ म्हणतात त्याप्रमाणे, "मनोविश्लेषण हा त्यांच्या कथेचा एक अविभाज्य भाग आहे. त्यांनी माणसाच्या गुंतागुंतीच्या व्यक्तित्वाचे आपल्या कथांतून मराठी वाचकांना दर्शन घडविले आणि मानवी व्यक्तित्वाच्या अजाणतेपणात बुडलेल्या भागाचे चित्रण करून त्याला एक नवे परिमाण दिले."[3] हे खरेच आहे.

## 4. 1925 ते 1945

या कालखंडात "करमणूक" व "मनोरंजन" मासिकांप्रमाणेच इतरही मासिकांचा झपाट्याने उदय झाला. त्यामध्ये प्रामुख्याने "रत्नाकर" (1926) व "यशवंत" (1928) या मासिकांचा आवर्जुन उल्लेख करावा लागेल. त्याचबरोबर (या काळात ज्योत्स्ना, किर्लोस्कर, समीक्षक, संजीवनी, ध्रुव, प्रतिभा इ. नियतकालिके बहरत होती. या सर्व मासिकांनी व नियतकालिकांनी इतर वाङ्‌मयप्रकाराबरोबरच कथावाङ्‌मयाला प्रकाशित होण्याची संधी दिली.) या काळाचे महत्त्व म्हणजे कथावाङ्‌मय-

प्रकाराला मिळालेली तांत्रिकतेची जोड· वाङ्·मयाला तांत्रिकतेने जोडण्याचा पहिला प्रयत्न फडके यांचा· फडकेंचे हे तंत्र पाश्चात्यांच्या कथातंत्रातून उदयास आले असे म्हणता येईल· वर उल्लेख केलेल्या नियतकालिकातून व मासिकांतून पाश्चात्य कथाकार गॉर्की, चेकॉव्ह, मोपासाँ, ओ हेन्री या कथाकारांच्या कथा प्रकाशित झाल्या· या कथा वाचून मराठी रसिकांना जगप्रसिध्द कथाकारांची ओळख तर झालीच पण त्याचबरोबर सूत्रबध्द तांत्रिक पध्दतीने लिहिलेल्या कथा व त्यातून त्यातील अनुभवविश्व कसे कलासंपन्न होऊ शकते याचाही अनुभव घेता आला. ही घटना मराठी कथावाङ्·मयाच्या विकासाला कारणीभूत ठरली यात शंका नाही· पाश्चात्य वाङ्·मयाच्या वाचनाने मराठी कथालेखकांची दृष्टी विस्तारत गेली व मानवी जीवनातील विविध विषयाकडे आकृष्ट झाली· मानवी जीवनातले साधे-सुधे प्रसंगदेखील किती गोड अनुभूतींचा अनुभव देऊ शकतात याची कल्पना साहित्यिकांना याच काळात आली· पाश्चात्य वाङ्·मयाच्या परिशिलनाने मराठी साहित्यिकांची दृष्टी पाश्चात्यांप्रमाणे आशय, विषय व अभिव्यक्तिच्या दृष्टीने या काळात बदलली, व्यापक व विस्तारित झाली व एखाद्या वाङ्·मयप्रकाराला तंत्राची जोड दिली, रचना-कौशल्याची जोड दिली तर तो वाङ्·मयप्रकार कसा कलात्मक उंची गाठू शकतो, याची कल्पना आली· पाश्चात्य लेखन पध्दतीने मानवी जीवनातले घटनाप्रसंग लिहिण्याचा प्रयत्न मराठी लेखकांनी आवर्जून केला· या प्रयत्नाचे श्रेय ना·सि·फडके यांना द्यावे लागेल· अशाप्रकारे (फडके यांनी "प्रतिभा-साधन" हा ग्रंथ लिहून तंत्रवादाला सुरुवात केली असे म्हणता येईल· या ग्रंथामुळेच ललित वाङ्·मयाच्या कलांगाकडे विशेष लक्ष गेले·)

फडकेंनी कथेसंबंधी लिहिताना आकर्षक प्रारंभ, परिणामकारक शेवट, निरगाठ उकल असे रचनातंत्र सुचवून त्यामध्ये उत्कंठावर्धन आणि आश्चर्यकारकता या बाबींचा समावेश अपरिहार्य मानला· या रचनातंत्राला अनुलक्षूनच फडकेंचे कथालेखन झाले आहे· "उलटे शाकुंतल", "शोभेसाठी" इ·त्यांच्या कथा तंत्रबध्द आहेत· गोड गैरसमज, अत्यल्प व क्षणिक संघर्ष, रहस्यातून उत्कंठा आणि शेवटी रहस्याचा धक्कादायक विस्फोट हे त्यांच्या कथांचे स्वरुप· धक्कादायकतेतूनच त्यांच्या कथा रहस्य कथांना

जवळ जाणा-या वाटतात· कारण त्यांच्या कथांचे शेवट हे धक्कादायक असतात· "विस्मयाचा धक्का देणे ही काही चूक नाही· पण तो धक्का कथाबीज उजळून मानवी जीवनावर लख्खन प्रकाश टाकतो आणि आपल्या चित्तवृत्ती थरारून सोडतो· फडकेंच्या गोड धक्क्याने तरुण-तरुणींना इच्छापूर्तीचा आनंद मिळाला तरी, जाणत्या वाचकाला त्याचा नकलीपणाच अधिक जाणवतो· कथेच्या बाह्यांगात मात्र फडकेंनी फार मोठी क्रांती केली·"[4]

(पूर्वीच्या कथांतील पाल्हाळ, पात्रांची गर्दी, दीर्घ संवाद यांना फडकेंनी मुरड घातली· पूर्वीच्या कथांतील अवाजवी संस्कृतप्रचुर व अतिबाळबोध भाषेला त्यांनी बगल दिली· त्यांनी भाषेत सफाईदारपणा आणला· तिचे बेंगरूळ-बेढब रूप बदलून तिला अटकर बांधा बहाल केला·)

याच कालखंडात फडकेंच्या बरोबर कथालेखन करणारे वि·स·खांडेकर हे प्रसिध्द कथालेखक· खांडेकरांच्या कथालेखनाने मराठी वाचकांना मोहिनी घातली· (वास्तवाला अद्भूततेची जोड देऊन वाचकाना एका वेगळ्या विश्वात नेऊन सोडण्याची किमया खांडेकरांच्या कथेत होती·) उदा·"गार वारा", "बाहुली" इ· त्यांच्या कथा· खांडेकर हे जीवनवादी लेखक होते· गांधीवादी तत्वाचा प्रभाव त्यांच्या लेखनावर दिसतो· भूतदयावाद हा त्यांच्या कथेचा केंद्रबिंदू होता· त्यांच्या जीवनवादी दृष्टीची तुलना करावयाची झाली तर टॉलस्टॉयचे उदाहरण डोळ्यापुढे उभे राहते· खांडेकर टॉलस्टॉयप्रमाणे जीवनवादी होते· परंतु ते टॉलस्टॉयप्रमाणे जीवनवेधी असते तर त्यांच्या कथा अधिक प्रभावी झाल्या असत्या· त्यांच्या जीवनवादी दृष्टीमुळे गरीब-श्रीमंत, श्रेष्ठ-कनिष्ठ या दोनच स्तरांवर त्यांच्या कथेतील संघर्ष वावरतो· अद्भूतरम्यता, अतिरंजितता, कृत्रिम संवाद, अलंकारिकतेचा फाजिल हव्यास इ·दोष त्यांच्या कथा-वाड्·मयात असूनसुध्दा ते एक लोकप्रिय व श्रेष्ठ कथाकार म्हणून वाचकांनी त्यांचा उदोउदो केला आणि त्यांना श्रेष्ठ कथाकाराचा बहुमान मिळाला·

मुख्यतः हा कालखंड "फडके-खांडेकर युग" म्हणून ओळखला जातो· या द्वयांच्या प्रेन उमेदीचा हा कालखंड होता· कलावाद कि जीवनवाद याविषयीची चर्चाही या कालखंडात, या लेखक द्वयांच्या संदर्भात पराकोटीला गेली होती· या काळातच कलावादी फडके कधी कधी जीवनवादाचा पुरस्कार करत असल्याचे तर (जीवनवादी खांडेकर कधी कधी कलावादाचा पुरस्कार करत असल्याचे जाणवते·) कलावाद आणि जीवनवाद यांची गाफील सरमिसळ झाल्यामुळे आणि त्यांच्या अतिरिक्त हव्यासामुळे, कथा कृत्रिमतेकडे झुकू लागली· जीवनवेधापेवजी एकांगी जीवनवादातील कृत्रिमता आणि तंत्राचा फोलपणा मराठी वाचकांच्या नि लेखकांच्या लक्षात येऊ लागला· या काळात कथाक्षेत्रात तंत्राचा शिरकाव झाल्यामुळे, कथावाङ्·मयात बेगडीपणा आल्याचे आढळते· जीवनातले अनुभव सहज स्वाभाविकपणे जेव्हा वाङ्·मयात येतात, तेव्हा त्या अनुभवांना वास्तवाचा स्पर्श होऊन एक प्रकारचा स्वाभाविकपणा व जिवंतपणा प्राप्त होतो· रचनेच्या तांत्रिकतेने, कथारचनेला तांत्रिकतेची जोड दिल्यामुळे कथेला बाह्यरेखीवपणा आला तरी, कथेतील आंतरिक जिव्हाळा कमी होतो· त्यामध्ये कृत्रिमता येऊ लागते, याची जाणीव या कालखंडात तीव्रतेने लक्षात येते·

तंत्राचा फोलपणा पटलेले काही कथालेखक याच काळात कथालेखन करू लागले· त्यात मामा वरेरकर, साने गुरुजी, अनंत काणेकर, प्रभाकर पाध्ये, वामन चोरघडे यांचा समावेश होतो· या लेखकांनी भावविवश कथा लिहिल्या. तरीही साने गुरुजींची "वामन भटजीची गाय" ही कथा सुंदर उतरली आहे· अनंत काणेकरांनी "काल प्रवाहाशी झुंज", "काळी मेहुणी", "दत्ताचे देऊळ", "मास्तरची मुलगी", "कुमारिका" इ·मनोवेधक कथा लिहिल्या· भाऊ पाध्येंच्या "पिंपळाचे झाड", "वेडी आशा" इ·कथा· (पाध्येंच्या कथांना प्रादेशिकतेचे अंग आहे· मार्मिक प्रतीक योजना आणि अस्सल प्रादेशिकता यामुळे पाध्येंच्या कथा मनाची पकड घेतात· चोरघड्यांनी तरुणांच्या भावुक मनाचे उत्कृष्ट दर्शन घडविले आहे·) विशेषत्वाने त्यांनी दिवाकरांच्या कथेतील मनोविश्लेषणाला, आपल्या कथेतून विकासगर्भ रूप प्राप्त करून दिले· या सर्व लेखकांना साचेबंद तंत्राचा फोलपणा पटलेला होता, असेच दिसते···या कालखंडात य·गो·जोशींनी मात्र तंत्राला खरा फटका दिला· "दुधावरची साय",

"शेवग्याच्या शेंगा" इ.त्यांच्या कथा. य.गो.जोशींनी मानवी मनाचे सखोल दर्शन घडविण्यात यश मिळविले. उदा."वहिनींच्या बांगड्या", "राहिलेले शब्द" या त्यांच्या कथा मानवी मनाचे सखोल दर्शन घडवितात.

या काळातील कथा ख-या अर्थाने अस्सलतेकडे ,वास्तवतेकडे झुकताना दिसतात.

5. 1945 ते 1960

या काळात गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु.भा.भावे, व्यंकटेश माडगुळकर यांनी वास्तवतेकडे-अस्सलतेकडे झेपवणा-या कथेला अधिक सूचकता आणि सूक्ष्मता प्राप्त करून दिली. या काळात "अभिरुची" आणि "सत्यकथा" ही मासिके ऐनभरात होती. या नव्या कथाकारांना प्रकाशात आणण्याचे कार्य या मासिकांनी केले. या काळात कथेचा विकासच नव्हे तर उत्क्रांतीच झाली, असे म्हणणे भाग पडते. याच दरम्यान शांताराम ओक, दि.बा.मोकाशी, श्री.ज.जोशी, हमीद दलवाई हे कथाकार पुढे आले. "या कथाकारांनी कथा या वाङ्.मयप्रकाराला कलात्मक सामर्थ्य व आत्मा प्राप्त करून दिला. त्याचप्रमाणे नवीन विषय गंभीरतेने हाताळण्याची धिटाईदेखील मिळवून दिली."[5] या कथाकारांनी घटनाप्रधान कथेला फाटा दिला. तसेच तंत्रवादालाही बगल दिली. त्यामुळे घटनेचा अभाव, दुर्बोधता, भाषेची मोडतोड, नाविन्याचा अतिरिक्त हव्यास, अश्लिष्टता, अश्लिलता, अप्रातिनिधकपणा, विकृत मनोविश्लेषण असे दोष त्यांच्या पदरी येऊन टीकेची झोड उठली. अर्थात "फडके"प्रणीत तंत्राचा वरचष्मा धारण केलेल्या या काळाला त्यांचे हे वेगळेपण मानवणारे नव्हते.

परंतु या काळातच कथेने सर्वस्पर्शी, सूक्ष्म, सूचक आणि सखोल रूप धारण केले. अर्थात कथेचा विकासगर्भ कायाकल्प घडला. "तलावातले चांदणे" यासारख्या गाडगीळांच्या कथा मानवी मनाचा आणि मानवी मनातील विसंगतींचा सूक्ष्म आणि खोल अर्थ सखोल संथपणाने शोधू लागली.

पु·भा·भावेंचे "सतरावे वर्ष" तर माडगुळकरांच्या "गावाकडच्या गोष्टी" या कथांनी अभिजाततेचा अवीट आविष्कार घडविला· विशेषत्वाने माडगुळकर आणि गाडगीळांच्या कथा, जीवन-जाणीवा आणि कलागुणांनी खच्चून भरलेल्या आहेत· जीवनाशयाचे सच्चे दर्शन घडविणे हेच कथेचे उद्दिष्ट असा विचार पाश्चिमात्य साहित्यात स्थिर झाल्याने, कथेचा हेतू प्रदर्शनाऐवजी प्रकटन असा झाला· त्यामुळेच त्यांच्या कथेत अनुभूतीचा प्रामाणिकपणा आला· कथेच्या कक्षा रुंदावल्या· सच्चा आशयाचे प्रकटन करण्यासाठी निरनिराळे घाट योजावे लागले· कथाविषयदेखील पूर्वीपेक्षा अधिक व्यापक, तरल, सूक्ष्म आणि सूचक बनत चालले·

गोखले, भावे यांच्याप्रमाणेच गाडगीळांच्या कथेतील व्यक्ती मध्यमवर्गीय आहेत· गोखलेंच्या कथेत मनोगहनाची सूक्ष्मता अधिक आहे· भावेंच्या कथेत चटकदार घटना, प्रसंग, दृश्य, मानसिक चमत्कृती वा वैगुण्ये, वैशिष्ट्ये, मानसिक संघर्ष, मानवी आणि नैसर्गिक भावविश्व, निर्जिवातील उदास जडता आणि एकूणच मानवी जीवनातील सूक्ष्मता अधिक आहे· तीच गोष्ट गाडगीळांबाबत· म्हणून या काळातील कथांना जीवनाचा खोल अर्थ प्राप्त झाला आहे·

वरील तिन्ही कथाकारांच्या कामगिरीबरोबर माडगूळकरांची कामगिरी स्पष्ट करताना आनंद यादव[6] म्हणतात, "गोखले, भावे, गाडगीळ यांनी नागर कथेला जसे बाळसे आणून तिचा विकास साधला तेच नेमके व्यंकटेश माडगुळकर यांनी ग्रामीण साहित्यात करून दाखविले·"

## 6· 1960 नंतरची कथा

या कालखंडात सर्वसाधारणपणे दिलीप चित्रे, चि·त्र्यं·खानोलकर, कमल देसाई, विद्याधर पुंडलीक, शरश्चंद्र चिरमुले, श्री·दा·पानवलकर, विजया राजाध्यक्ष, जयवंत दळवी, मधु मंगेश कर्णिक, आनंद जातेगांवकर, ए·वि·जोशी, बाबूराव बागूल, सुधा नरवणे, अनिल डांगे अशी कितीतरी नावे सांगता येतील· या काळातील कथा अधिकच समृध्द, प्रयोगक्षम आणि कलासंपन्न झाली·

आधुनिक पाश्चिमात्य साहित्यामधील नव्या वाटा या काळातील कथाकारांनी कथेला मिळवून दिल्या. स्वतःच्या अशा खास वेगळ्या वाटेने हे कथाकार यशस्वीपणे वाटचाल करू लागले. त्यांची वाटचाल ही अत्यंत आत्मविश्वासपूर्वक सुरू आहे.

मराठी कथावाड्.मयाच्या प्राथमिक अवस्थेपासून म्हणजेच त्याच्या उदयावस्थे-पासून आतापर्यंतच्या त्याच्या स्वरूप आणि वाटचालीवरून, वरीलप्रमाणे दृष्टीक्षेप टाकला असता क्रमाक्रमाने त्याचे स्वरूप कसे बदलत गेले आणि टप्प्याटप्प्याने त्याचा विकास कसा होत गेला, हे ध्यानात येते.

## ब. ग्रामीण कथावाड्.मयाच्या अनुषंगाने -

### 1. 1925 ते 1941

एकूणच मराठी कथावाड्.मयाच्या उदय, वाटचाल आणि विकासाचा ढोबळ मानाने आढावा घेतल्यानंतर पुन्हा केवळ ग्रामीण कथावाड्.मयाच्या अनुषंगाने विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

आतापर्यन्तच्या कथावाड्.मयातील जीवनाशय आविष्काराच्या दृष्टीने विचार करता बहुतेक लेखक मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजातलेच होते, असे आढळून येते. हरिभाऊ आपटे यांच्यापासून लेखन करणा-या सर्व लेखकांनी शहरी जीवनाची चित्रणेच आपल्या कथावाड्.मयातून रेखाटली व महाराष्ट्रातील शहरी जीवनाचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला व त्याच शहरी जीवनदर्शनाच्या अनुषंगाने मराठी कथेने विकासाच्या वाटा मळल्या.

महाराष्ट्र हा खेड्यापाड्यांचा देश आहे. मराठमोळी संस्कृती येथे घडली. संतांच्या पारलौकीक वृत्तीचे दर्शन जसे इथे घडले, तसे ऐहिक जीवनाचे दर्शनही घडले. त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या वीरत्वाचे, पराक्रमाचे, पौरुषत्वाचे दर्शनही घडले. महाराष्ट्र ही संतांची तशीच वीरांची भूमी आहे. छ.शिवाजी राजांची मावळसेना खेड्यापाड्यांतून एकत्र जमा होऊन संघटित झाली. त्यामुळेच छत्रपतींना स्वराज्याची

स्थापना करता आली· हा महाराष्ट्रामध्ये वावरणारा जीता-जागता समाज खेड्यापाड्यातील होता· औदार्यवंत महाराष्ट्राचा, या महाराष्ट्रीयांना सार्थ अभिमान होता· त्यांची संस्कृती, त्यांची निष्ठा, त्यांची श्रध्दास्थाने, त्यांच्या धर्मकल्पना, त्यांचा धर्मभोळेपणा यात त्यांची खरी जीवनजाण अंतर्भूत होती· हा खेड्यातील समाज आपली संस्कृती जपत होता· त्यांची जीवनमूल्ये, जीवनधारणा या पांढरपेशांहून वेगळ्या आहेत· वाङ्·मयनिर्मितीच्या कालखंडाचा विचार केला तर बहुतेक वाङ्·मयलेखन हे पांढरपेशी जीवनाभोवतीच फिरत होते· त्यातील बहुतेक लेखक हे शहरी जीवन जगणारे होते व त्याच जीवनाचे दर्शन त्यांनी आपल्या कथा-कादंबऱ्यांतून चित्रित केले· ते जे जीवन जगत होते त्याच शहरी जीवनाचे चित्रण त्यांनी केले· परंतु महाराष्ट्रात बहुसंख्य खेड्यापाड्यात जगणारा जो ग्रामीण समाज होता तो या शहरी जीवनापासून दूरच होता· त्यांचे गावगाड्याचे जीवन यंत्रयुग आले तरीही सातत्याने होते तसेच होते· अशा या ग्रामीण जनतेच्या सुखदुःखाचे चित्रण साहित्याच्या प्रांतात दुर्दैवाने उपेक्षितच राहिले· या कालखंडाच्या टप्प्यात ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न ज्या लेखकांनी केला त्यांचा नामनिर्देश येथे करणे प्रस्तुत संशोधन विषयाच्या दृष्टीने योग्यच ठरेल·

मध्यवर्ती मराठी साहित्यापासून थोड्या वेगळ्या स्वरूप-वैशिष्ट्याने "ग्रामीण आणि प्रादेशिक" हे साहित्य थोडे वेगळे असल्या कारणाने, तसेच त्याला स्वतःचा असा खास वेगळा इतिहास आणि भरीव अशी परंपरा असल्या कारणाने, त्याचा वेगळा विचार करणे गरजेचे ठरते· म्हणून इतिहासाच्या संदर्भात त्याच्या उदय-वाटचाल आणि विकासाचा धावता परामर्श घेण्याचा मनोदय आहे···सांकेतिक पध्दतीने ग्रामीण ठरलेले "कृत्रिम ग्रामीण कथावाङ्·मय" आणि (ग्रामीण अनुभूतीची तसेच ग्रामीण जीवनाची अस्सल स्पंदने साकार करणारे कथावाङ्·मय ) या दोहोंत बराच फरक आहे·

व्यंकटेश माडगुळकरांनी "गावाकडच्या गोष्टी" लिहिल्यानंतर ख-या अर्थाने अस्सल ग्रामीण कथेला सुरुवात झालेली दिसते· त्याअगोदरही ग्रामीणतेचा आविष्कार कथेमध्ये झाला आहे· परंतु त्यापूर्वीचे मराठी कथेतील ग्रामीणत्व भडक,

कृत्रिम, निसत्व, सांकेतिक आणि सजावटीसारखे होते· ख-या अर्थाने जातीवंतपणाचा, जिवंतपणाचा आणि अस्सल अनुभूतीचा त्याला स्पर्श झालेला नव्हता·

ग्रामीण जीवनाचे चित्रण करणा-या लेखकांचे दोन गट पडतात· - 1·ते जीवन सुधारले पाहिजे या हेतूने लेखन करणा-या लेखकांचा गट· आणि 2·अद्भूत-रम्यतेच्या ओढीने ग्रामीण जीवनाच्या चित्रणाकडे वळलेल्या लेखकांचा गट· शहरी जीवनावर ग्राम जीवनाचा साज चढवून ग्रामीण कथा लिहिल्या गेल्या आहेत· ग्रामीण जीवन जगलेल्या लेखकांनी जशी ग्रामीण कथांची निर्मिती केली आहे, तितकी प्रत्ययकारी निर्मिती ग्रामीण जीवन दुरुन पाहणारांना करता आलेली नाही· ग्रामीण भाषा, पोषाख, निसर्ग यांचा साज चढवून काही लेखक ग्रामीण कथा तयार करतात· अशा कथांचा शरीर व आत्मा हे ग्रामीण वाटत नाही· त्या कथाकारांचा सखोल परामर्श येथे प्रस्तुत ठरत नाही· परंतु ज्या कथांचा पिंड सर्वार्थाने, सर्वांगाने ग्रामीण आहे असे लेखक ग्रामीण लेखक म्हणून नावारुपाला आले आहेत· त्यांपैकी काहींचा परिचय पुढीलप्रमाणे देणे गरजेचे ठरते·

1925 ते 1941 या काळात ख-या ग्रामीण जीवनाच्या आणि प्रादेशिक जीवनाच्या जाणिवा घेऊन कथा लिहिल्या जाऊ लागल्या· ख-या अर्थाने या ग्रामीण अनुभूतीच्या आविष्काराला प्रारंभ झाला तो 1925 पासूनच· या प्रारंभाचे खरे श्रेय वि·स·सुखटणकर यांना द्यावे लागते· तत्पूर्वी म्हणजेच 1898 ला हरिभाऊ आपटेंची "काळ तर मोठा कठीण आला।" ही ग्रामीण कथा सापडते· परंतु ग्रामीण कथा-वाङ्·मयाची सुरुवात आपटेंच्या या कथेपासून झाली असे मात्र म्हणता येत नाही· कारण, "ग्रामीण जीवनाच्या खास जाणीवा घेऊन ती जन्माला आलेली नाही· केवळ आज ग्रामीण वाङ्·मयाच्या विपुलतेमुळे त्याच्या जन्माचा शोध घेत घेत भूतकाळात जाताना ती एक खूण दिसते एवढेच·"[7] म्हणून ग्रामीण कथावाङ्·मयाची यथार्थ सुरुवात करण्याचे श्रेय हरिभाऊंकडे जात नाही· मात्र "ग्रामीण जीवनाविषयीच्या वाङ्·मयीन जाणीवा प्रथम वि·स·सुखटणकर यांनी निर्माण केल्या· 1931 साली त्यांनी "सह्याद्रीच्या पायथ्याशी" हा आपल्या आठ प्रादेशिक कथांचा संग्रह प्रसिध्द

केला· "आजचे व कालचे गोमंतक" असेही त्याचे पर्यायी नाव आहे· "आक्रमण पहिले", "आठ स्वतंत्र प्रादेशिक कथा" अशाही सूचना त्यावर आहेत· या संग्रहातील कथा ते 1925-28 पासून लिहिताना दिसतात·"[8]

सुखटणकरांच्या या कथांना प्रादेशिकतेचे अंग आहे· त्यांच्या कथांतून गोमंतकांचे, तेथील निसर्ग, संस्कृती आणि चालीरीतींचे तेथील समस्यांसह दर्शन घडते· तेथील समाजजीवन, माणसांमाणसांतील संबंध, त्यांची स्वभाववैशिष्ट्ये, तिथल्या प्रथा-परंपरा आणि एकूणच प्रदेशाची विशिष्टता या सा-यांचा परिचय त्यांच्या कथेतून होतो· गोव्यातील देवदासींची चाल, त्यांचे सामाजिक स्थान, त्यांची सामाजिक कुचंबना, गावागावांतील वैर, सामान्य गावकरी आणि श्रीमंत वतनदार यांच्यातील हेवेदावे, तेथील धार्मिकतेच्या कल्पना, लटका अभिमान, लाचारी, नव्या-जुन्या मनोवृत्ती, भांडण-तंटे, श्रध्दा-अंधश्रध्दा, सामाजिक संकेत आणि एकूणच गोव्यातील तत्कालीन परिस्थितीचे चित्रण त्यांच्या कथांतून घडते· त्यांच्या कथांबद्दल म·ना·अदवंत म्हणतात, "त्यांच्या कथांत, भरपूर पाल्हाळ असूनही त्यातील प्रभावी व्यक्तिचित्रणामुळे, त्यातील सखोल जीवनदर्शनामुळे व प्रादेशिक वातावरण निर्माण करणा-या लेखकाच्या सामर्थ्यामुळे यांतील कथा ‘सह्याद्रीच्या पायथ्याशी" वाचकांच्या मनाची विलक्षण पकड घेतात·"[9]

त्यांच्या कथांत काही दोषही आहेत· बाह्य घटकांचा प्रभाव, कृत्रिम रचनात्मकता, योगायोगाच्या घटनांवर भर, भडक चित्रण, कृत्रिम नाटकी संवाद, अतिरंजितता, असंभवनीयता इ·दोष दिसून येतात· तरीसुध्दा "वाङ्·मयीन अनुभवासाठी एक प्रचंड क्षेत्र (ग्रामीण प्रदेश) मोकळे असल्याचे त्यांनी दाखवून दिले· त्यांचे हे कार्य ग्रामीण वाङ्·मयाच्या संदर्भात पायासारखे आहे, हे मान्य करावे लागते·"[10] असे आनंद यादव म्हणतात ते खरे आहे·

वि·स·सुखटणकरांच्या काळातच लक्ष्मणराव सरदेसाई यांनी कथालेखन केले· त्यांच्या कथानांही गोमंतकाचीच पार्श्वभूमी आहे· तिथला निसर्गसौंदर्याने विनटलेला प्रदेश त्यांच्या कथांतून चित्रित झाला आहे की जो प्रदेश त्या व्यक्तिजीवनाचाच

एक अविभाज्य भाग म्हणून आल्यासारखा वाटतो· त्या प्रदेशातील जीवनपध्दती, तेथील प्राकृतिकतेशी संलग्न असणा-या मानवी भावभावना, तेथील लोकांचे राहणीमान, रूढी, परंपरा हे सारे तेथील समस्यांसह त्यांच्या कथांतून चित्रित झाल्यामुळे, त्यांच्या कथांना प्रादेशिक वेगळेपणा प्राप्त झाला आहे· "कल्पवृक्षाच्या छायेत", "सागराच्या लाटा", "वादळातील नौका", "ढासळलेले बुरूज", "अनीतीचे दिव्य", "मांडवी तू आटलीस", "संसारातील अमृत", "मोहोर", "लक्ष्मण रेषा" इ·लक्ष्मणराव सरदेसाई यांचे हे कथासंग्रह यासंदर्भात उल्लेखनीय आहेत·

या दोन्ही प्रादेशिक कथालेखकांच्या कथांतील प्रादेशिक आशय फारसा व्यापक नसला तरी, अगर त्यात काही उणिवा असल्या तरी इतर कथालेखकांचे लक्ष या अबाधित ग्रामीण प्रदेशाकडे खेचून घेण्याचे महत्त्वाचे श्रेय या दोघांनाच द्यावे लागते· त्यांनी आपल्या कथांतून "ग्रामीण", "प्रादेशिक"विश्वाची ओळख करून दिली इतकेच नव्हे तर, या विश्वाला प्रतिष्ठा प्राप्त करून देऊन त्याच्याबद्दल आस्था निर्माण केली, असेच म्हणावे लागेल·

या दोन लेखकांची प्रेरणा घेऊन पुढे अनेक कथालेखकांनी "ग्रामीण" व "प्रादेशिक" कथालेखनाला सुरूवात केली· याच कालखंडात गोमंतकीय पार्श्वभूमीवर जयवंतराव सरदेसाई, वि·ल·बर्वे, कंटक, पै,बा·द·सातोस्कर, रघुवीर सामंत इत्यादिंनी कथालेखन केले· सुखटणकर-सरदेसाई नंतर पुदे अनेक प्रादेशिक लेखकांनी प्रादेशिक कथेला खतपाणी घालून तिचा विकास साधला· या कथालेखकांनी "प्रादेशिक" आणि "ग्रामीण" अशा दोन्ही सदरात कथानिर्मिती करण्यात यश मिळविलेले दिसते·

प्रादेशिक कथानिर्मितीच्या प्रेरणेतूनच ग्रामीण कथेचाही जन्म झाला, असे म्हटले तरी फारसे वावगे ठरणार नाही·

"ग्रामीण" आणि "प्रादेशिक" कथालेखनाच्या अनुषंगाने काही प्रमुख ग्रामीण कथाकारांचा थोडक्यात परिचय करून घेता येईल, हा परिचय पुढीलप्रमाणे-

## 2· 1941 ते 1946

### 1· श्री·म·माटे

ख-या अर्थाने ग्रामीण जीवनाची सुखदुःखे, तेथील व्यक्तींच्या सुखदुःखातील चढउतार, श्री·म·माटे यांनी आपल्या "उपेक्षितांचे अंतरंग" या ग्रामीण कथासंग्रहातून चित्रित केले आहेत· त्यांचा "उपेक्षितांचे अंतरंग" हा कथासंग्रह 1941 मध्ये प्रसिध्द झाला· त्यांना "ग्रामीण कथेचे" अग्रदूत म्हणतात हे योग्यच वाटते· मात्र सुखटणकरांना "प्रादेशिक कथेचे" अग्रदूत म्हणावयास हवे· समाजातील विविध स्तरातील उपेक्षितांच्या दुःखाची वास्तवपूर्ण, जीवंत आणि करूणगर्भ जाणीव माटेंच्या कथेची पायाभूत प्रेरणा आहे· त्यांच्या कथांतून त्यांचे समाजोन्मुख, सुहृदय आणि सत्सेवाभावी व्यक्तिमत्व स्पष्ट होत जाते· त्यांच्या कथांना स्थिरता, परिपक्वता आणि चिंतन यांचे अधिष्ठान लाभलेले दिसते· त्यांच्या कथा चित्रणात्मक आहेत· व्यक्तिचित्रण पध्दती, तपशीलांचा बारकावा, कथात्मक रसाळपणा, वेधक शैली, हृदयंगम आणि प्रत्ययकारी समाजदर्शन हे त्यांच्या कथेचे वैशिष्ठय·

ग्रामीण कथेचे क्षेत्र फार व्यापक आहे, याची गडद जाण मराठी वाचकांना त्यांच्या कथांनी दिली· त्यांच्या ग्रामीण कथेने मराठी वाचकांवर प्रचंड मोहिनी घातली· त्यांच्या लिखाणातून कळत-नकळत प्रेरणा घेऊन इतर कथाकार या क्षेत्रात उतरले म्हणूनच त्यांना देण्यात आलेली "मराठी ग्रामीण कथेचे अग्रदूत" ही गौरवसंज्ञा सार्थ ठरते·

सुखटणकर, सरदेसाई यांनी निर्देशित केलेल्या प्रादेशिक जीवनाच्या कक्षेत येणा-या, ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवर कथालेखन करून माटेंनी बरेच यश मिळविले, असेच म्हणावे वाटते· "श्री·म·माटे यांचे नागर मराठी कथेच्या क्षेत्रात विशेष महत्वाचे कार्य नसले तरी ग्रामीण कथेच्या संदर्भात त्यांचे कार्य अतिशय महत्वाचे आहे, हे ग्रामीण साहित्याच्या सर्वच समीक्षकांनी मान्य केले आहे·"[11] यावरून त्यांच्या ग्रामीण कथा प्रांतातील महत्त्वपूर्ण योगदानाची साक्ष पटते·

2· ग·ल·ठोकळ

हे मार्टेंचे समकालीन ग्रामीण कथालेखक· ग्रामजीवनातील अज्ञान, रांगडेपणा, रानदांडगेपणा, माणसां-माणसांतील वैर, जुलूम, जबरदस्ती, दादागिरी, शेतातील नाट्यपूर्ण प्रसंग, सण, उत्सव, जत्रा, प्रेमप्रकरणे, भटक्या जमातींचे जिणे इ·त्यांच्या कथांचे विषय· त्यांच्या कथाविषयात वैविध्य, विपुलता व वैचित्र्य आहे· त्यांचा "कडुसाखर" हा पहिला कथासंग्रह 1943 मध्ये प्रसिध्द झाला· (त्यांच्या कथांतून आलेले ग्रामीण जीवन हे भडक, थरारक व कल्पनाजन्य, अद्भूत घटनांवर भर देणारे आहे·) त्यामुळे त्यांची कथा घटनाप्रधान झाली· म्हणूनच ती अस्सल जीवनदर्शना-पासून, ख-या ग्रामीण वास्तवापासून दूर जाताना दिसते· आनंद यादव म्हणतात त्याप्रमाणे, "वास्तवापेक्षा अद्भूतता, व्यक्तीपेक्षा घटना, अर्थपूर्णतेपेक्षा कल्पनाजन्य, काव्यात्मकता, नाट्यपूर्णता यांचे त्यांना आकर्षण फार आहे· त्यामुळे त्यांची कथा ग्रामीण वास्तवापासून, ग्रामीण जीवनदर्शनापासून बाजूला सरकते·"12

(असंभवनीयता, स्वप्नरंजनात्मकता, अतिरंजितता, अद्भूतरम्यता इ·दोष जरी त्यांच्या कथेत दिसले, तरीही नाट्यमय घटनाप्रसंगांची विपुलता व अत्यंत वेधक आणि प्रभावी भाषाशैली यामुळे त्यांची कथा लोकप्रिय झाली, हेही नाकारता येत नाही·)

3· र·वा·दिघे

दिघे हे माटे व ठोकळ यांचे समकालीनच· त्यांचा "दंडकारण्यातील रम्य रात्री" हा पहिला कथासंग्रह 1940 मध्ये प्रसिध्द झाला· तसेच "पूर्तता" हा त्यांचा आणखी एक प्रसिध्द कथासंग्रह· त्यांचा कथालेखन काळ 1940 ते 1946 असा आहे· "दिघ्यांच्या कथेतून कोंकण आणि सह्याद्रीच्या कुशीतील व्यक्तींच्या तोंडची भाषा, शब्द, वाक्प्रयोग, लोकजीवन आणि निसर्गाची बारकाईने टिपलेली दृश्ये यांचे दर्शन घडते· म्हणूनच सुरूवातीला त्यांची कथा प्रादेशिक कथा म्हणून ओळखली जात होती·"13

त्यांची कथा काव्यमय आहे· कथेत विस्तारित व स्वतंत्र वर्णने आहेत· अद्‌भूत रम्यता आणि कल्पनारम्यता यांचा स्पर्श त्यांच्या कथेला आहे· त्यांच्या काही कथा सुधारणावादी आहेत· त्यामध्ये प्रचारवाद डोकावतो· "पूर्तता"प्रमाणेच "वादळ" हाही त्यांचा प्रसिध्द कथासंग्रह· भडक, रंजक, काव्यात्मक व भावस्पर्शी भाषेमुळे त्यांची कथा लोकप्रिय ठरली· लोककथा, लोकगीते, ओव्या यांचा आढळ त्यांच्या कथांतून होतो· त्यांची कथा अल्पगुणी असूनसुध्दा, तिच्यामध्ये एकतानता असल्यामुळे ती मनावर ठसते·

याच काळात वामन चोरघडे, दत्तू रघुनाथ कवठेकर आदि मंडळी नागर कथालेखनाबरोबरच अधूनमधून तुरळक प्रमाणात ग्रामीण कथाही लिहीत होते परंतु ग्रामीण कथाकार म्हणण्याइतपत ते नावारूपाला आले नाहीत·

### 4· म·भा·भोसले

सातत्याने ग्रामीण कथा लिहिणारे म·भा·भोसले यांना ग्रामीण जीवनाचा अनुभव असूनही ते फडके-खांडेकर किंवा ठोकळ-दिघे यांच्या वळणाच्याच कथा लिहितात, याची नकळत खंत वाटते· वास्तविक ग्रामीण जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव असल्यामुळे त्यांच्या कथेतील ग्रामीण व्यक्तिचित्रणे व ग्रामीण जीवनातील परखड व कठोर संघर्षाची चित्रणे प्रत्ययकारी व्हायला हवीत, पण तसा अनुभव त्यांच्या ग्रामीण कथांतून येत नाही· (खेड्यातील निसर्ग, तेथील दारिद्र्य, तेथील घरे, शेतांची व पिकांची वर्णने ते सर्रास करतात· आणि त्याद्वारे ग्रामीण वातावरणाची निर्मिती करताना दिसतात· त्यांची ही वातावरण निर्मिती काहीशी प्रभावी वाटते· परंतु व्यक्तिचित्रणात व संघर्षवर्णनात ते स्वाभाविकता आणू शकले नाहीत·)

ग्रामीण जीवनातील समस्या ते कधीच विचारात घेत नाहीत व कथा-निवेदनाच्या ओघात मूळ विषय सोडून ते भलतीकडेच भरकटत जातात· त्यांच्या कथानिवेदन शैलीत सरळपणा आहे· परंतु ग्रामीण जीवनाचे सत्यदर्शन त्यांच्या कथेत घडत नाही, असे वाटते·

अशाप्रकारे या काळातील श्री·म·माटे यांचा अपवाद वगळता ग·ल·ठोकळ, र·वा·दिघे व म·भा·भोसले या कथाकारांचे कथालेखन हे स्वप्नरंजनात्मकतेच्या व मनोरंजनात्मकतेच्या आकर्षणातून व हव्यासातून निपजले असल्याने, ग्रामीण जीवनाची सर्वंकष सखोल अर्थपूर्णता व या जीवनाचे प्रत्ययकारी व वास्तववादी दर्शन घडविण्यास ते असमर्थ ठरलेले दिसते· तरीदेखील माटेंचे मोठेपण मान्य करूनही ठोकळ, दिघे यांना कमी लेखता येत नाही· कारण "प्रथमतः ग्रामीण जीवनाची स्वप्नरंजनात्मक का होईना पण वेगळी जाणीव ग·ल·ठोकळ आणि र·वा·दिघे यांनी निर्माण केली·"[14] हे नाकारता येत नाही·

## 3· 1946 ते 1960

1946 च्या दरम्यान मराठी कथेत अंतर्बाह्य बदल झाला· कथावाड्·मयात विलक्षण परिवर्तन घडून आले· मानवी मनातील गुंतागुंतीचे वास्तव दर्शन घडविणारी नवकथा या काळात जन्मास आली· ग्रामीण कथेत नवकथेचा नवा प्रवाह सुरू करण्याचा मान व्यंकटेश माडगुळकरांकडेच जातो· 1945 ते 50 या कालावधीत कथेचा विकासगर्भ कायाकल्प घडला· भावे, गोखले, माडगुळकर, गाडगीळ यांनी मराठी कथेला नवकथेचे परिमाण प्राप्त करून दिले व मराठी कथा मनोविश्लेषणात्मक झाली· या काळात फ्राइडच्या मानसशास्त्राने कमालीचा प्रभाव पाडला त्यामुळे इतर वाड्·मयप्रकाराबरोबरच कथावाड्·मयातही अमूलाग्र परिवर्तन झाले· माडगूळकरांनी अस्सल प्रदेश जीवनाच्या (प्रादेशिक जीवनाच्या) पार्श्वभूमीवर नवकथा लिहिली, ती अगदी उठून दिसते· म्हणूनच "माडगूळकरांनी नवकथेला मानदेशी जीवनाचा अस्सल मराठमोळा साज बहाल केला·"[15] हेही तितकेच खरे वाटते·

### 1· व्यंकटेश माडगुळकर

माडगुळकरांनी 1946 पासून कथालेखनाला सुरुवात केली· "वडारवाडीच्या वस्तीत" ही त्यांची पहिली कथा 1946 मध्ये प्रसिध्द झाली· त्यानंतर "काळ्या तोंडाची" ही कथा 1947 मध्ये प्रसिध्द झाली· त्यांच्या "माणदेशी माणसं" या

पहिल्या कथासंग्रहाने वाचकांच्या मनाची पकड घेतली. ग्रामीण कथेला सूक्ष्मता आणण्याचे कार्य माडगुळकरांनी केले. (त्यांची कथा अधिक जीवनस्पर्शी व वास्तव असून, तिने कलात्मक उंची गाठली आहे.) त्यांच्या संदर्भात म.द.हातकणंगलेकर म्हणतात, "माडगुळकरांनी आपल्या ग्रामीण जीवनाची अभिजात नस पकडली."[16] हे योग्यच वाटते. त्यांच्या कथेत निसर्ग व कथानकाचे एकरूपत्व साधले आहे. त्यांच्या कथेत विषयात आशयात विविधता आहे. दुष्काळी मातीत जगणारी, धडपडणारी - दरिद्री, धाडसी, वेडी, सहनशील, बेरकी, भानगडखोर, नाठाळ अशी नानाविध प्रकारची माणसे त्यांच्या कथेत येतात. त्यांच्या स्वभावातून निर्माण होणा-या घटना, गोष्टी, गमती, अवस्थांतरे त्यांनी आपल्या कथेत रेखाटले आहे. माडगुळकरांच्या अनुभवाचा प्रदेश म्हणजेच "माणदेश" हा वेगळा असला तरी आजवर लिहिल्या गेलेल्या ग्रामीण कथेपेक्षा त्यांचे अनुभवविश्व वेगळे नाही. म्हणजे सुखटणकर, सरदेसाई, ठोकळ-दिघे-माटे यांच्याप्रमाणेच एक तर ते ग्रामीण आहे आणि व्यापक पातळीवर प्रादेशिक आहे.

माडगुळकरांच्या ग्रामीण कथांमधील प्रादेशिकतेच्या वैशिष्ट्यांबरोबरच त्यांच्या कथेतील अनुभवाचा कस, त्या अनुभवाला लाभलेली खोली, त्यातील सूक्ष्मता, तरलता आणि घनता अधिक स्वाभाविक आहे. त्यांच्या कथालेखनाची कक्षा तथा क्षेत्र हे तेच असले तरी त्यातही त्यांनी निश्चित अशी वेगळीक साधली आहे, ती वेगळीक म्हणजे, "आजपर्यन्त कमी-अधिक फरकाने विस्तारत गेलेली ग्रामीण कथा माडगुळकरांनी विकसित केली. तिला वेगळे परिमाण दिले. त्यामुळे तिला वेगळे तेच चढले."[17] हे आनंद यादव यांचे विधान कथावाङ्मयाच्या विकासाकडे आपले लक्ष वेधून घेते, त्यामुळे माडगुळकरांच्या कथेचे सामर्थ्य आणि तिचे यश सकारण लक्षात येते.

2. **शंकर पाटील**

व्यंकटेश माडगुळकरांनंतर लगेचच 1949 पासून शंकर पाटलांनी कथालेखनास सुरुवात केली. "वळीव" हा त्यांचा पहिला कथासंग्रह. मानवी मनात शिरकाव

करून, मानवी मनाची गुंतागुंत आंदोलने त्यांनी आपल्या कथेतून उलगडून दाखविली. मानवी मनाचा तळ गाठण्यामुळे त्यांच्या कथेला खोली प्राप्त झाली. ख-या अर्थाने त्यांची कथा अधिक सकस आणि अविष्कारशील बनली. त्यांच्या "आभाळ", "वेणा", "पात", "सारवण", "धिंड", "भुजंग" यासारख्या कथा उल्लेखनीय आहेत. (त्यांच्या कथेतही निसर्ग, मानव आणि कथानक यांची एकरूपता साधलेली दिसते.) त्यांच्या कथेचा घाट, प्रतिमाविश्व-सुंदर, एकजीव आणि अपरिहार्य आहे. मानवी जीवनापेक्षा मानवी मनःसंघर्षावर त्यांनी अधिक भर दिला आहे. ग्रामीण जीवनापेक्षा ग्रामीण मन आणि निसर्ग त्यांच्या कथेत चित्रीत झाला आहे. त्यांनी कलात्मक जाण अधिक तीव्र करून, ग्रामीण कथा अधिक समृध्द आणि संपन्न केली. "विशेषतः माणसाच्या मनाचे चित्रण करण्यासाठी त्यांनी ग्रामीण कथेत पहिल्यांदा केलेला संज्ञाप्रवाहाचा वापर लक्षणीय आहे. माणसाच्या मनाचे अनेक पापुद्रे त्यामुळे लक्षात येतात. पाटलांची निवेदनासाठी वापरलेली खास वैशिष्ट्यपूर्ण भाषा ही महत्त्वाची आहे. अशा अनेक वैशिष्ट्यांमुळे शंकर पाटलांची कथा म्हणजे ग्रामीण कथेच्या विकासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे."[18]

## 3. द.मा.मिरासदार

मिरासदारांचे कथालेखन 1946 च्या आसपास सुरू झाले. "माझ्या बापाची पेंड" हा त्यांचा पहिला कथासंग्रह. तसेच "विरंगुळा", "स्पर्श", "भुताचा जन्म" इ.त्यांचे प्रसिध्द विनोदी कथासंग्रह. मिरासदारांनी ग्रामीण कथेला वेगळीच दिशा दिली. "सतत विनोदी कथा यशस्वीपणे लिहिणारे द.मा.मिरासदार हे पहिले लेखक."[19] कारण व्यक्ती, घटना, प्रसंग व कथानक यांच्या मर्यादित वर्तुळात विनोद निर्मिती करणे तसे अवघडच. पण मिरासदारांनी ते क्षेत्र पूर्णतः काबीज केले. (शब्दनिष्ठ आणि कोटीक्रमावर त्यांचा विनोद आधारलेला नसतो तर तो सरळ सरळ व्यक्तीचा स्वभाव व प्रसंग यावरही आधारलेला असतो.) माणसांच्या विभिन्न व विविध प्रवृत्तीचे, स्वभावाचे विविध पैलू ते आपल्या कथांतून रंगवतात. जीवनातील विसंगतीवर भर देऊन लिहिलेल्या कथा मराठीमध्ये संख्येने अल्प आहेत. मराठी ग्रामीण कथेत विनोदी

कथा लिहून त्यांनी मोलाची भर घातली आहे·

बढ़ाईखोर, भित्रट, इरसाल, कावेबाज, धूर्त, विक्षिप्त, नादिष्ठ, नाठाळ इ·त्यांची कथापात्रे· भूते-प्रेते, चो-या, फसवणूक, व्यसने, गुन्हे, खटले, साक्षी इ·ची प्रसंगनिर्मिती हे त्यांचे कथाविषय असल्याने त्यांची कथा रंजक होते· विनोदाद्वारे ग्रामीण कथेचे वेगळेपण सिध्द करून तिला लोकप्रियता प्राप्त करून देण्याचे कार्य मिरासदारानी केले आहे· "ग्रामीण व्यक्तिचित्रणात्मक कथेत कथन प्रवृत्तीचे आकर्षक रूप आणण्यास व्यंकटेश माडगुळकर आणि शंकर पाटील यांच्याबरोबर द·मा· मिरासदारांचाही फार मोठा वाटा आहे·"[20] असे डॉ·वासुदेव मुलाटे यांनी सांगून, (नव्या कथावाङ्·मय प्रवाहात कथानिवेदन प्रवृत्तीची पडलेली भर)आवर्जुन नोंदविली आहे·

4· **रणजीत देसाई**

1947 च्या सुमारास देसाईंनी कथालेखनास प्रारंभ केला· "रूपमहाल", "मधुमती", "कणव", "जोश", "कातळ", "वैशाख", "बाबूलमोरा", "आलेख" इत्यादी त्यांचे कथासंग्रह· (मानवी जीवनातील लहान-सहान घडामोडींपेक्षा एखादाच ठळक प्रसंग, एखादाच उत्कट व थरारक क्षण चित्रित करण्याचा त्यांना छंद आहे·) विशेषत्वाने माणसांच्या जीवनातील विशेष घडामोड, शर्यती, झुंजी, जत्रा, मानपान, चढाओढ, त्यातून निर्माण होणारी भांडणे आणि मत्सर इत्यादींचे चित्रण त्यांच्या कथांतून येते· वैभवाचा झोक दाखविणारे पाटील-जमीनदार, इनामदार, परस्परांच्या सुखाचा आणि संपत्तीचा हेवा करणारे लोक, मानी-ताठर-गर्विष्ठ तसेच स्वतःला प्रतिष्ठीत समजणारे रगेल आणि रंगेल धनिक लोक इत्यादींचे चित्रणही ते ठसठशीत करतात· खरे तर ग्रामीण शेजीजीवनाभोवती त्यांची कथा फिरते· करूण-गंभीर तर कधी कधी शृंगारिक प्रणयप्रसंग ते आपल्या कथांतून टिपतात· त्यांची कथा रंजक व सांकेतिकतेच्या कोंदनात अडकल्यामुळे कथाक्षेत्रातील आपला प्रभाव ते टिकवू शकले नाहीत·

5· रा·रं·बोराडे

मराठवाड्यातील ग्रामीण जीवन त्यांच्या कथांतून व्यक्त झाले आहे· (त्यांची स्वतःचा शोध घेण्याची धडपड सदैव जाणवते·) प्रारंभी त्यांच्या कथांवर माडगुळकर, शंकर पाटील व मिरासदार यांच्या कथांचा प्रभाव पडलेला दिसतो· नंतर त्यांच्या कथांनी आपले स्वतःचे असे सौष्ठव धारण केले· वेगळाच घाट शोधला· त्यांच्या निवेदन पध्दतीला एक वेगळे सामर्थ्य प्राप्त झाले आहे· त्यांच्या काही कथांतून बालविश्व चित्रित झाले आहे· त्यांच्या कथा अनुभवाची एक वेगळीच पातळी गाठतात· ✓ ग्रामीण कथेला ती अनोखी आहे· (स्त्री मन आणि बालमन यांचा त्यांनी आपल्या कथांतून घेतलेला वेध अत्यंत प्रभावी आहे·) "पेरणी" ते "मळणी" पर्यन्तचा त्यांचा प्रवास यशस्वी असाच आहे·

6· आण्णाभाऊ साठे अण्णाभाऊ साठे

आण्णाभाऊ साठेंची पात्रे अन्यायाविरुध्द बंड करतात· मात्र त्यांच्या कथेत अस्पृश्येतेतून आलेले कथाविषय थोडे आहेत· त्यांचे गावगाड्याचे, वास्तव सामाजिकतेचे आणि प्रदेश जीवनाचे आकलन चांगले दिसते· म्हणूनच क्वचित प्रसंगी दलितांची दुःस्थिती आणि त्यांची करूणचित्रे रेखाटताना, बेवास्तव सामाजिकतेचा अतिशयोक्त वापर ते कुठेच करत नाहीत· अन्याय, अत्याचाराविरूध्द प्रतिकार करण्याचे मार्ग त्यांनी आपल्या लिखाणातून सुचविले· त्यांच्या कथेतील प्रेमी पात्रे एकमेकांवर जीवापाड प्रेम करताना जात, धर्म, समाज, व्यवहार हे सारे काही विसरतात· सा-या जगाला विसरतात· प्रेमाने वा सुडाने धुंद झालेली त्यांची पात्रे आपल्याच नशेत जगतात आणि मरतात· अशा चित्रणात भडकपणा, नाट्य आणि उत्कटता असल्यामुळे ते लोकप्रिय कथाकार ठरले· त्यांच्या कथांबाबत डॉ·रविंद्र ठाकूर म्हणतात, "आण्णाभाऊंनी वास्तवाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील वैरांच्या आणि वीरविनायकांच्या कथा लिहिल्या·"[21]

7· महादेव शास्त्री (य·गो·जोशी)

मराठी कथाविश्वात आपल्या कथेचा वेगळा आणि सोज्वळ ठसा य·गो·जोशी यांनी उमटविला· (लोकमंगलाच्या पुरस्कारातून व निष्ठेतून त्यांच्या कथेचा जन्म झाला·/ सत्-प्रवृत्तीचा, सत्भावनांचा प्रभाव, कौटुंबिक जीवनातील मनास चटका लावणाऱ्या प्रसंगातून त्यांनी फार प्रभावीपणे मांडला आहे· त्यांच्या कथा चार भिंतीच्या आतील प्रसंग आणि नात्या-नात्यातील मायेचे पाझर यांनी ओथंबल्या आहेत· मर्यादित क्षेत्रातील विषय-आशय-प्रसंग त्यांनी आपल्या कथेत आणले· मध्यमवर्गीय कौटुंबिक वातावरणाच्या वर्तुळात त्यांनी कथा फिरली· तिच्या अंग-प्रत्यंगातून सोज्वळ गोडवा प्रतीत होतो· प्रसंगनिष्ठ आणि जिव्हाळ्याचे प्रसंग त्यात आल्यामुळे त्यांची कथा लोकप्रिय झाली· "अन्नपूर्णा", "वहिनींच्या बांगडया", "शेवग्याच्या शेंगा" इत्यादी त्यांच्या कथांवर चित्रपट निर्माण होऊन त्यांना व त्यांच्या कथेला प्रसिध्दी मिळाली·

4· 1960 ते द·ता·भोसलेपर्यन्त

1· आनंद यादव

ग्रामीण साहित्यामध्ये ग्रामीण चळवळ निर्माण करणारे आनंद यादव हे आजचे आघाडीचे लेखक, "खळाळ", "उखडलेली झाडे" हे त्यांचे प्रसिध्द कथासंग्रह· त्यांनी आपली खास ग्रामीण शैलीची कथा आणली आणि ती लोकप्रिय केली· कथेचे निवेदन खास ग्रामीण भाषेतून केले· डॉ·ठाकूर म्हणतात त्याप्रमाणे, "शंकर पाटलांच्या कथेत ग्रामीण माणसाच्या मनाविषयी लेखक बोलत होता· तर यादवांच्या कथेत ग्रामीण माणूसच बोलू लागला·"[22] त्यांच्या कथेत ग्रामीण संस्कृती, कृषी समस्या, मानवी प्रचार व प्रसार त्यांनी तळमळीने केला आणि त्यासाठी समीक्षा ग्रंथ, चर्चासत्र आयोजित केली· मराठी ग्रामीण साहित्याला विकासाचे वळण लावण्यास जे कथाकार पुढे आले, त्यात यादवांचे योगदान मोठे आहे·

"यादवांच्या कथेचे साकल्याने आकलन करताना असे दिसून येते की, यादवांची कथा घटनेत रमण्याऐवजी माणसाच्या अंतरंगात शिरू पाहते. सामान्य ग्रामीण माणसाचे सुखदु:ख हा तिच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. त्या माणसाचे सुखदु:ख ती त्याच्याच भाषेतून आविष्कृत करू पहाते. येथेच ग्रामीण कथेला नव्या आविष्कार माध्यमाचे परिमाण लाभते. याच अर्थाने यादवांची कथा माडगुळकर आणि शंकर पाटील यांच्या कथेचा विकास ठरते."[23]

2. **द.ता.भोसले**

द.ता.भोसले यांनी 1960 नंतर कथालेखनास प्रारंभ केला. त्यांनी सात कथासंग्रह लिहिले आहेत. त्यापैकी "अगं अगं म्हशी" आणि "पाऊस" हे दोन कथासंग्रह विशेष उल्लेखनीय आहेत. त्यांच्या कथालेखनाचा बाज अस्सल ग्रामीण ढंगाचा असून त्याला प्रादेशिकतेचे अंग आहे. स्वाभाविकता आणि देशी वाण हे त्यांच्या कथालेखनाचे खास वैशिष्ट्य. ग्रामीण साहित्यातील चिंतनशील कथालेखक अशी त्यांची ओळख करून देणे उचित ठरेल. त्यांनी कथेबरोबर कादंबरी, नाटक आणि समीक्षा लेखनही केले आहे. परंतु मराठी रसिक वाचकांना ते कथाकार म्हणूनच जवळचे वाटतात. खरे पाहता त्यांचा पिंड कथाकाराचाच दिसतो. त्यांचे कथालेखन परिपक्व, चिंतनशील आणि प्रयोगक्षम वाटते. त्यांची कथा कुठल्याही तंत्राच्या चौकटीत अडकल्यासारखी वाटत नाही. तरीसुध्दा तिला स्वत:चे असे सत्व, स्वत्व आणि प्रयोगक्षमता आहे असे जाणवते.

त्यांची भाषा साधी, सरळ आणि सूचक आहे. सहजता आणि स्वाभाविकता हा त्यांच्या भाषेचा विलक्षण विशेष. त्यांच्या शैलीला सहज कलात्मकता लाभल्याचे दिसते. त्यांची कथानिवेदनपध्दती आवश्यकतेनुसार प्राथमिक पातळीपासून कलात्मक पातळीपर्यन्त अनेकविध परिणाम साधताना दिसते. म्हणूनच त्यांच्या कथेला कलात्मक उंची प्राप्त झाल्याचे दिसते. तसेच कथावाङ्मयाच्या विकासाच्या दृष्टीने त्यांची कथा कलात्मक, संपन्न आणि समृध्द झाल्याचे दिसते.

त्यांच्या "अगं अगं म्हशी" व "पाऊस" या दोन कथासंग्रहातील कथा या ग्रामीण जीवनाशी ग्रामीण प्रदेशाशी व शेतीजीवनाशी निगडीत आहेत. त्यामध्ये शेतीकाम करणा-या, मोलमजुरी करणा-या व झोपडीत (खोपटात) राहणा-या सामान्य माणसांच्या जीवनातील सामान्य प्रसंग विलक्षण बोलके करुन असमान्य केले आहेत. शहरी माणसापासून व शहरी जीवनापासून दूर राहणा-या लोकांच्या तथा शेतक-यांच्या कृषि जीवनातही कितीतरी आगळेवेगळे घटनाप्रसंग घडत असतात. सुखदुःखे उद्‌भवत असतात. व्यथा, वेदना सलत असतात. त्याचप्रमाणे कितीतरी हास्यास्पद स्वाभाविक घटना घडत असतात. द.ता.भोसलेंनी आपल्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीने आणि आपल्या सूक्ष्म प्रतिभा सामर्थ्याने कृषी जीवनातील हे सर्व घटनाप्रसंग, व्यक्ती, त्यांचे जीवन, त्यांचा राग-लोभ, त्यांची सुखदुःखे, त्यांच्या व्यथा वेदना, त्यांच्या जीवनातील हास्यास्पद प्रसंग, त्यांचे वृत्तीविशेष अचूकपणे टिपले आहेत. आणि म्हणूनच मला स्वतःला द.ता.भोसले हे मराठी ग्रामीण कथाकारांमधील एक उल्लेखनीय नाव आहे असे वाटते. ग्रामीण जीवनाच्या बदलत्या स्थितीगतीचे अत्यंत वास्तव, भेदक आणि कलात्मक चित्रण त्यांनी आपल्या या दोन कथासंग्रहातून केले आहे.

"अगं अगं म्हशी" या कथासंग्रहातील कथा या ग्रामीण शेतीजीवनाशी आणि प्रदेशजीवनाशी निगडीत आहेत. हा कथासंग्रह विनोदी ग्रामीण कथासंग्रह म्हणून विशेष उल्लेखनीय वाटतो. या संग्रहातील कथांचा बाज अस्सल ग्रामीण विनोदी ढंगाचा असून त्याला प्रादेशिकतेचे अंग आहे.

"पाऊस" या त्यांच्या कथासंग्रहात खेडयातील स्त्रियांच्या गुदमरलेल्या आयुष्याचा जसा परिणामकारक आविष्कार व्यक्त झाला आहे तसाच खेड्यातील स्त्रियांच्या दारिद्र्याने करपून गेलेल्या स्वप्नांचा परिणामकारक आविष्कारही व्यक्त झाला आहे. बदलत्या खेड्याचे नवनवे रुपदर्शन घडविणे हे या कथासंग्रहाचे खास वैशिष्ठ्य आहे.

खोपटवासीय तथा झोपडपट्टीच्या उपेक्षित जगाचे या कथांतून घडणारे दर्शन अंतर्मुख करणारे आहे. तीच अंतर्मुखता "अगं अगं म्हशी" या विनोदी कथासंग्रहातील कथांमधून आढळते. या दोन कथासंग्रहातील कथांनी मलाही अंतर्मुख केले. मीही खेड्यातील एक तरुण असल्याने या खेड्यांतील जीवनाचा मला जवळून परिचय आहे व त्यामुळेच या दोन कथासंग्रहातील जीवन, अनुभूती आविष्काराशी मी एकरूप झालो. या एकरूपतेतूनच दोन कथासंग्रहातील प्रादेशिकतेचा चिकित्सक अभ्यास करण्याची मला प्रेरणा झाली. द.ता.भोसले यांनी खेड्यातील विश्व येथे बोलके केले आहे. या दोन कथासंग्रहांच्या अभ्यासाने ते अधिक बोलके करण्याचा माझा मनोदय आहे. ग्रामीण जीवनाच्या रास्त प्रेमाने व खेड्यातील जीवन जगलेल्या अधिकाराने हा विषय मी निवडला व तो विद्यापीठाने मान्य केला, हे मी माझे भाग्य समजतो. यामुळेच परिचित विषयाशी माझे जीवनाचा बंध-अनुबंध मला खात्रीपूर्वक जोडता येईल, असा विश्वास वाटतो. पुढील प्रकरणात ग्रामीण कथावाङ्मयातील प्रादेशिकतेचा वाङ्मयीनदृष्ट्या विचार मी करणार आहे व त्याच पार्श्वभूमीवर द.ता.भोसले यांच्या कथासंग्रहांचा वाङ्मयीन अभ्यास करणार आहे.

यादव-भोसलेंप्रमाणे याच काळातले इतर काही कथाकार आहेत. खरे तर डॉ.सरोजिनी बाबर, नामदेव व्हटकर, हसमनीस, हमीद दलवाई, मधु मंगेश कर्णिक, बा.भ.पाटील, चंद्रकुमार नलगे, महादेव मोरे, आनंद यादव, सखा कलाल ते द.ता.भोसले असा हा क्रम आहे. परंतु या सर्वांचाच आढावा घेणे येथे अप्रस्तुत आहे. (फक्त इतिहासाच्या दृष्टीने आणि परंपरेच्या दृष्टीने त्यांचा उल्लेख करणे उचित ठरते. कथावाङ्मयाच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक तेवढा आढावा वरीलप्रमाणे घेतलाच आहे.)

या काळातील काही कथाकारांनी वि.स.सुखटणकर, सरदेसाई, श्री.म.माटे यांच्या दिशेने मार्ग आखला तर काहींनी आपल्या नवीन वाटा शोधल्या. वि.स.सुखटणकर ते द.ता.भोसलेंपर्यन्त ही ग्रामीण कथावाङ्मयाची परंपरा पाहिली तर त्यातील विविधता लक्षात येते. यापेक्षाही कितीतरी नावे ग्रामीण कार्यक्षेत्रात

पुढे येतील· खरेतर या नावांची फार मोठी यादी तयार होईल· पण इतिहासाच्या संदर्भात फक्त वेगवेगळ्या प्रेरणा, वैचित्र्य व विकास पाहण्याच्या दृष्टीने, ग्रामीण कथावाड्·मयाची ही वाटचाल संक्षेपाने आणि आवश्यक तेवढीच घेतली आहे· अशाप्रकारे मराठी ग्रामीण कथेचे दालन समृध्द आणि विकसनशील असल्याचे दिसून येते·

आतापर्यन्त आढावा घेतलेल्या अलिकडील ग्रामीण कथालेखकांच्या बरोबरीनेच, ग्रामीण कथालेखन करणारे काही नवोदित ग्रामीण कथालेखक, नव्या उमेदीने ग्रामीण कथालेखन करण्यात रस घेताना दिसत आहेत· त्यांचे ग्रामीण कथालेखनाचे प्रयत्नही ग्रामीण कथावाड्·मयाच्या विकासाला हातभार लावीत आहे, असे म्हणावे लागेल· ग्रामीण कथावाड्·मयाची ज्योत या सर्व लेखकांनी उज्ज्वलपणे विकसनशील केली आहे· ती यापुढेही तेवत ठेवण्याचे काम या नवोदित लेखकांच्याकडे येणे स्वाभाविक आहे· पुढील काळातही दमदार व कसदार ग्रामीण जीवनाचा आविष्कार व्यक्त करण्याचे सामर्थ्य या नवोदित लेखकांच्या प्रतिभेत असेल असा आशावाद व्यक्त करावासा वाटतो·

<u>संदर्भ-</u>


1· हातकणंगलेकर म·द· : ग्रामीण कथा रूप आणि परिसर, सुपर्ण प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, मार्च 1986, पृ·29

2· अदवंत म·ना· : प्रदक्षिणा "कथावाड्·मय", कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, चौथी आवृत्ती, 1968, पृ·133

3· गाडगीळ गंगाधर : खडक आणि पाणी, "नवकथा" स्वरूप आणि आक्षेप", पॉप्युलर प्रकाशन मुंबई, दुसरी आवृत्ती 1966, पृ·225-226·

4· मालसे स·गं· : आवड निवड, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, प्रथमावृत्ती जानेवारी 1959, पृ·47

5· हातकणंगलेकर म· द· : ग्रामीण कथा-रूप आणि परिसर, सुपर्ण प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, मार्च 1986, पृ·28

6· यादव आनंद : ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीयावृत्ती जुलै 1993, पृ·18

7· तत्रैव, पृ·11

8· तत्रैव, पृ·14

9· अदवंत म·ना· : प्रदक्षिणा "कथा वाड्·मय", कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती 1968, पृ·173

10· यादव आनंद : ग्रामीण साहित्य - स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, तृतीयावृत्ती जुलै 1993, पृ·12

11· यादव आनंद : ग्रामीणता साहित्य आणि वास्तव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, मे, 1981, पृ·67

12· यादव आनंद : ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीयावृत्ती, जुलै 1993, पृ·15·

13· मुलाटे वासुदवे : ग्रामीण कथा - स्वरूप आणि विकास, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती जानेवारी 1992, पृ·10

14· तत्रैव, पृ·9·

15· ठाकूर रवींद्र : आनंद यादव - व्यक्ति आणि वाड्·मय, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती जुलै 1993, पृ·8

16· हातकणंगलेकर म·द· : महाराष्ट्र साहित्य पत्रिका - ग्रामीण साहित्य विशेषांक, 1980, पृ·53

17· यादव आनंद : ग्रामीण साहित्य - स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीयावृत्ती जुलै 1993, पृ·18

18· मुलाटे वासुदेव : ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती जानेवारी 1992, पृ·24

19· यादव आनंद : ग्रामीण साहित्य - स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, तृतीयावृत्ती जुलै 1993, पृ·20

20· मुलाटे वासुदेव : ग्रामीण कथा - स्वरूप आणि विकास, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती जानेवारी 1992, पृ·25

21· ठाकूर रविंद : आनंद यादव - व्यक्ति आणि वाड्·मय, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, जुलै 1993, पृ·28

22· तत्रैव, पृ·9

23· तत्रैव, पृ·26